

# आरक्षणाचे धोरण, सामाजिक न्याय आणि भारतातील लोकशाहीवादी राजकारण

: संपादक :

डॉ. फैय्याज मुनीरसाब सौदागर




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ५२) | आरक्षणाचे धोरण व सामाजिक न्यायः एक अवलोकन.<br>**- डॉ.प्रताप पाटील** | ११६ |
| ५३) | आरक्षणाचे धोरण आणि सामाजिक न्याय.<br>**- प्रा. साहेबराव मलदोडे, प्रा.अर्जून मोरे** | ११७ |
| ५४) | आरक्षणाचे धोरण, सामाजिक न्याय आणि भारतातील लोकशाही राजकारण.<br>**- डॉ.कविता सोनकांबळे** | ११९ |
| ५५) | आरक्षणाचे धोरण, सामाजिक न्याय आणि भारतातील लोकशाहीवादी राजकारण.<br>**- क्षीरसागर संजय दगडू** | १२२ |
| ५६) | आरक्षण धोरण आणि सामाजिक न्याय : एक सहसंबंधीय विश्लेषण.<br>**- डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव** | १२४ |
| ५७) | आरक्षण धोरण : भारतीय संविधान आणि सामाजिक न्याय.<br>**- डॉ. ढोबळे डी. बी., डॉ. आनिल देशमुख,** | १२७ |
| ५८) | कल्याणकारी राज्य आणि आरक्षणाचे धोरण.<br>**- डॉ.विलास अघाव** | १२९ |
| ५९) | सामाजिक न्याय : जागतिकिकरणाचा प्रभाव.<br>**- प्रा. रगडे लक्ष्मण विठ्ठलराव** | १३१ |
| ६०) | सामाजिक न्याय आणि भारतीय राज्यघटना.<br>**- डॉ.मानवते उत्तम हुसनाजी** | १३४ |
| ६१) | सामाजिक न्याय आणि आरक्षण.<br>**- डॉ.आंधळे बी.व्ही.,** | १३६ |
| ६२) | सामाजिक न्याय व आरक्षण.<br>**- प्रा. औचित्य बेंजामीन चार्ल** | १३८ |
| ६३) | राजकीय न्यायाचे एक साधन-राजकीय आरक्षण.<br>**- प्रा. क्षीरसागर दिलीपकुमार दगडू** | १४० |
| ६४) | सामाजिक न्यायाच्या सिद्धांतकनाची स्त्रीवादी चिकित्सा.<br>**- डॉ.अनुराधा पाटील** | १४२ |
| ६५) | आरक्षण, सामाजिक न्याय व लोकशाही.<br>**- पल्लवी पांडे (जोशी)** | १४४ |
| ६६) | आरक्षण धोरण, खाजगीकीकरण व सामाजिक न्यायः एक दष्टीक्षेप.<br>**- प्रा. विलास भारत बनसोडे** | १४६ |
| ६७) | डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्याय आणि हक्क यावरील विचार.<br>**- विनोद दत्तराव झाडे** | १४८ |
| ६८) | भारतातील आरक्षण संकल्पना आणि ओ.बी.सी.<br>**- डॉ. ढाले एस.यु.** | १५० |
| ६९) | भारतीय राज्यघटनेतील ओबीसी तरतुद व सद्य स्थिती.<br>**- डॉ.दत्ता कुंचेलवाड** | १५२ |
| ७०) | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मराठा समाज आरक्षण : एक सिंहावलोकन.<br>**- डॉ.कोंडेकर आर.एस.** | १५४ |
| ७१) | महाराष्ट्रातील मराठा व मुस्लीम समाजाचे आरक्षणाचे अवलोकन : एक अभ्यास.<br>**- डॉ.संजीवन कदम** | १५६ |
| ७२) | मराठा आरक्षण : आवश्यकता आणि आव्हाने.<br>**- डॉ.माधव कदम** | १५८ |
| ७३) | मराठा आरक्षण : शोध आणि बोध.<br>**- डॉ.राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे,** | १६० |
| ७४) | भारतीय संविधान व मराठा आरक्षण.<br>**- डॉ.अंभुरे एस.डी.** | १६३ |
| ७५) | धनगर जमातीच्या आरक्षण प्रश्नातील वास्तव.<br>**- डॉ.यशपाल भिंगे** | १६५ |
| ७६) | क्रिडा आरक्षण.<br>**- डॉ.अमोलसिंह दशरथसिंह गौतम** | १६७ |


Scanned with CamScanner

# ५६) आरक्षण धोरण आणि सामाजिक न्याय : एक सहसंबंधीय विश्लेषण

**डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव**

**विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक, पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय, देगलूर.**

## ❖ प्रस्तावना :

भारतात आरक्षण का ? या प्रश्नाचे उत्तर व्यक्ती व राजकीय पक्ष परत्वे वेगवेगळे येईल, परंतू याच प्रश्नाला भारतीय संविधानाचा आधार दिला असता सामाजिक न्याय व लोकशाहीच्या संरक्षणासाठी आरक्षण असे समर्पक उत्तर येईल. प्रस्तुत लेखात वरील विधानातील सत्यता तपासणे आणि सामाजिक न्याय व आरक्षणातील सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. वर्तमानातील भारतीय राज्याच्या राजकारणाकडे नजर टाकता गुजरात, राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्र यासह अनेक राज्यांतून आरक्षणाच्या मागणीसाठी अहिंसक व हिंसक आंदोलने होत आहेत. तर आरक्षणच नष्ट करावे अशीही मागणी पुढे येत आहे. आरक्षित समुहाने खुल्या प्रवर्गाच्या जागावर नौकरीसाठी अर्ज करु नये,अशा प्रकारचा आदेश गुजरात उच्च न्यायालयाने दिला. महाराष्ट्रात ओ.बी.सी.साठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. या सर्व आरक्षणाशी संबंधीत घटनाक्रमाकडे पाहता कांही प्रश्न निर्माण होतात. आरक्षण हा गरीबी हटावचा कार्यक्रम आहे ? का सामाजिक न्यायाचा ? आरक्षण हा प्रशासन व राजकारणातील प्रवेशाची वाट सुकर करणारा मार्ग आहे. त्यामुळेच अनेक राज्यातील बड्या जातीसमुहाकडून आरक्षणाचे आंदोलन छेडले जात आहे. अशा पार्श्वभूमीवर आरक्षणाचा सहसंबंध सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकासाशी कसा आहे ? हे समजून घेण्याच्या हेतूने मांडणी करण्यात आली. आरक्षण सामाजिक व आर्थिक समता दर्शवणारे एक मापक आहे. या मापकाचे वाटेकरी वाढले तर सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकास निर्माण होईल ? का समाजातील आरक्षण धारक व सवर्ण यांच्यातील तिढा वाढेल. जो लोकशाहीसाठी धोकादायक आहे.

फ्रान्स, अमेरिका, रशिया, चीन व भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातून मानवाच्या समानतेचे सुत्र समप्रमाणात रेखाटण्यात आले. ज्यातून लोकशाहीतील लोकांच्या सत्तेच्या सिध्दांतावर भर देण्यात आला. ज्याचा सार मनुष्य मनुष्यात काही अंतर नाही. सामाजिक कराराचा समर्थक जिन जैक्स रुसो म्हणतो, मनुष्य जन्मतः स्वतंत्र आहे परंतू तो सर्वत्र बंधनात जखडला आहे. रुसोचे हे विधान मानवाचे शोषण, विषमता व पारतंत्र्य स्पष्ट करते. तसेच सर्वसामान्य मानवाने स्वातंत्र्य, समता व बंधुतेप्रमाणे चांगल्या जीवनप्राप्तीसाठी प्रयत्नरत राहण्याचे संकेतही देते. परंतू रुसोच्या विधानातील ऐतिहासिकता वास्तवरुपाशी मिळत नाही. समाजात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विषमता आहेत. या अडथळ्यांना दूर करण्यासाठी एक सर्वसमावेशक जीवनशैलीच्या प्राप्तीसाठी राज्यघटनेत आरक्षणाची तरतूद केली. कारण विकासाच्या मुख्यधारेशी समाजातील अंतिम व्यक्तिला जोडले नाही तर तो अन्याय होईल. भारतीय राज्यघटनेच्या निर्मात्यांनी भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायास प्राथमिकता दिली. सर्वसमावेशक विकासाचा विचार दारिद्र्यास दुर करणे संधीची समानता देणे आणि सामाजिक गतिशीलतेला संचलित करण्यात व्यस्त आहे. विशेषतः सामाजिकदृष्ट्या विच्छिन्न समुहांना परंपरागत कार्य व कौशल्यासह पुढे घेवून त्यांना विशेष संधी मिळवून देतात.

भारतीय प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास वर्णाश्रमाअंतर्गत ब्राह्मणाच्या उच्चतेचे गोडवे गात होता, तर दूसरीकडे शुद्राच्या रुपातील विशाल जनसमुहाला अधिकारापासून वंचित आणि कर्तव्याच्या बंधनात बांधुन सामाजिक, राजकीय, शैक्षणिक विषमतेच्या भट्टीत टाकुन देत होता. निम्न जातीतील हे लोक स्पर्श न करण्यायोग्य आणि अपवित्र मानले गेले. हिंदू वर्गाच्या या तथाकथित निम्न जातींना राज्यघटनेने अनुसूचित जाती आणि मागास क्षेत्रात राहणाऱ्या जातींना अनुसूचित जमातीचे नाव दिले. महिलांबाबतीत लिंगामुळे नकारात्मक भेदभाव केला जात होता. इतर अल्पसंख्यांक समुदाय विशेषतः देशातील कांही भागातील मुसलमान समुदायांना विकासाचा लाभ मिळाला नाही. ज्याचे समर्थन मुस्लीम समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्तराचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या सच्चर समितीने केले. यासर्व समुहांना सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनाच्या मुख्यप्रवाहात आणण्याचे प्रयत्न सर्वसमावेशक विकासाची संकल्पना करते. भांडवलवादाच्या प्रत्येक टप्याकडे विकास विषयक संकल्पनांची एक विशिष्ट शृंखला मांडणाऱ्याच्या स्वरुपात पाहिले जाते.

१९५० च्या दशकापासून विकासाला सामाजिक विकासाच्या दृष्टिकोणातून मांडले जावू लागले. जे की, आरोग्य, सुरक्षा, शिक्षण, संपत्तीचे समान वितरण आणि राजकीय निर्णयाच्या जनसहभागित्वाशी जोडले गेले. मुलभुत आवश्यकतावर जोर देण्यात येवू लागला. विकासाच्या या संकल्पनेत सर्वाधिक व्यापक अभिव्यक्ती अमर्त्य सेनच्या स्वातंत्र्याच्या रुपातील विकासाच्या सुत्रीकरणात आढळते. वर्तमानात जागतिकीकरणाच्या युगात विकासाचे जे चित्र निर्माण झाले. त्यास, चांदी की चमक के पीछे काले बादलों की छाया म्हणता येते, कारण यात श्रीमंत व गरीबांची वाढती दरी, खेडी व शहरातील विषमता आणि राज्यातील विषमतेचे मोठे चित्र स्पष्टपणे जाणवते. त्यामुळे विकासाच्या संकल्पनेला सामाजिक न्यायासारख्या विशाल विषयासोबत जोडण्याचा प्रयत्न झाला. ॲरिस्टॉटलच्या मते, न्याय म्हणजेच समता होय. त्यांच्या मते जे समान आहे त्यासोबत समान आणि जे विषम आहे त्यासोबत विषम व्यवहार करावा. अन्याय तेंव्हा होतो, जेंव्हा समानासोबत विषम आणि विषमासोबत समान व्यवहार केला जातो. सकारात्मक कार्य सामाजिक अन्यायाला दूर करण्यासाठी आवश्यक आहे. भारतीय सभ्यता व संस्कृतीत जातिच्या आधारावर विभागलेले मागास आणि दलित अस्पृश्य होते. परंतू स्वातंत्र्य आंदोलनाच्या विभिन्न विचारधारांनी समाजाच्या या दुःखास ओळखुन सामाजिक न्यायाच्या तरतुदीस आमच्या राज्यघटनेत समाविष्ट केले. राज्यघटनेच्या प्रस्तावनेत सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायास समाविष्ट करुन विकासा सोबत सामाजिक न्यायाला सहभागी केले. समाजातील वंचित वर्गास समाजाच्या मुख्यप्रवाहात जोडण्यासाठी राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात मुलभुत अधिकारांची तरतूद केली. चौथ्या भागात मार्गदर्शक तत्वाची नोंद करुन राज्याला स्पष्ट निर्देश दिले. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक न्यायाप्रतीच्या या वचनबध्दतेमुळे राज्यघटनेत मागासवर्गासाठी विशेष म्हणून आरक्षणाची तरतूद केली.

## ❖ आरक्षण आणि राज्यघटना :

राज्यघटनेतील १६ व्या भागात आंग्ल भारतीय समुह, अनुसूचित जमाती आणि इतर मागास जाती साठी विशेष तरतूद केली. या विशेष तरतूदींचा उद्देश राज्यघटनेतील कलम ४६ मध्ये स्पष्ट केले की, राज्य जनतेच्या दुर्बल भागाला विशेषतः अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे शिक्षण आणि अर्थविषयक हितांची विशेष सुरक्षा करण्यासाठी आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करेल. राज्यघटनेतील भाग १६ च्या कलम ३३० ते ३४२ पर्यंत या वर्गासाठी विशेष व्यवस्था केली. ती चिरकालीन व्यवस्था नसून अल्पकालीन व्यवस्था आहे. कारण सामाजिक समतेच्या निर्धारण लक्ष्याची प्राप्ती होताच ही व्यवस्था समाप्त होईल. राज्यघटनेच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यापासून फक्त १० वर्षापर्यंतच या तरतुदींना लागु करण्याचे ठरले होते. परंतु नंतर घटनादुरुस्तीच्या आधारे या विशेष व्यवस्थांचा कालावधी वाढवला. आठव्या, तेविसाव्या, पंचेचाळीसाव्या, बासष्टाव्या, एकोणऐंशीव्या घटना दुरुस्तीने आरक्षणाचा कालावधी १० वर्षाने वाढवण्यात आला. राज्यघटनेतील १६ व्या भागातील कलम ३३१ मार्फत राष्ट्रपतीस हे अधिकार दिले की, ते



Scanned with CamScanner

लोकसभेत अधिकाधिक दोन ॲंग्लो इंडियनची नियुक्ती करतील, जर त्यांच्या मतानुसार ॲंग्लो इंडियनला योग्य प्रतिनिधित्व मिळाले नसेल. अशाचप्रकारे राज्यघटनेने कलम ३३३ नुसार राज्याच्या राज्यपालांना हा अधिकार दिला की, जर विधानसभेत ॲंग्लो इंडियन समुदायास योग्य प्रतिनिधित्व मिळाले नसेल तर गरजेनुसार त्यांना प्रतिनिधित्व द्यावे. राज्यघटनेची अंमलबजावणी केल्यापासून १० वर्षानंतर या समुदायास शासकीय सेवात विशेष सुविधा व शैक्षणिक संस्थासाठी विशेष अनुदानाची व्यवस्था करण्यात आली. आता ही व्यवस्था नष्ट झाली. अनुसूचित जाती व जमातींना संविधाने प्रमुखत: स्थानीय विशेष व्यवस्था करण्यात आल्या. सर्वात प्रथम राज्यघटनेने या वर्गासाठी लोकसभा, विधानसभेत काही जागा आरक्षित ठेवण्याची तरतूद केली. या जातीतील व्यक्ति आरक्षित जागेशिवाय इतर मतदारसंघातून निवडणूक लढू शकतो. वर्तमान लोकसभेत एकूण मतदारसंघाची संख्या ५४३ आहे. त्यात अनुसूचित जाती आणि जमातीसाठी ७९ आणि ४० जागा सुरक्षित ठेवल्या. विधीमंडळातील प्रतिनिधित्वासोबत अनुसूचित जाती व जमातींना केंद्र व राज्याच्या मंत्रीमंडळात नेहमी प्रतिनिधित्व देण्यात आले. कलम ३५५ मध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या प्रशासकीय सेवात जागा सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था केली. या जातींना शासकीय सेवात प्रतिनिधित्व देण्यासाठी ज्या अटी टाकल्या त्यात वयोमानात सूट, योग्यता स्तरावर सूट, कार्यकुशलतेचा निम्न स्तर पूर्ण केल्यानंतर त्यांची निवड आणि निम्नश्रेणीतील त्यांची निवड व बढतीची विशेष तरतूद. राज्यघटना आरक्षित जागांच्या तुलनेत आणि केंद्रे निर्धारित करत नाही, तर प्रशासनाद्वारा नियमाअंतर्गत यास निर्धारित करण्याची व्यवस्था केली. या जातींच्या हितांची रक्षा करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित विषयांची तपासणी करण्यासाठी राज्यघटना ३३८ मध्ये एका विशेष पदाधिकाऱ्याची व्यवस्था केली. या व्यवस्थेला अधिक प्रभावी करणे. ६६ व्या घटनादुरुस्तीतून अनुसूचित जाती आणि जमातीसाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना करून त्यास घटनात्मक दर्जा दिला.

### ❖ आरक्षण आणि आयोग :

राज्यघटनेतील कलम ३४० अंतर्गत ही व्यवस्था केली की, राष्ट्रपती दोन आयोगाची निवड करतील. पहिला अनुसूचित क्षेत्रात प्रशासन आणि अनुसूचित जातीच्या कल्याणासंबंधी प्रकरणाची तपासणी करावी लागेल. दुसऱ्याचे कार्य मागास जातिच्या शैक्षणिक आणि सामाजिक स्थितीची तपासणी करणे. याशिवाय अतिरिक्त आयोग त्यांच्या प्रगतीच्या उपायांकडे केंद्राचे ध्यान आकर्षित करतील. राज्यघटनेतील १६ व्या भागातील या तरतूदीशिवाय कलम २७५ नुसार अनुसूचित जातिच्या विकासाच्या उद्देशाने बनवलेल्या योजनांसाठी राज्यशासनांना विशेष अनुदान देण्याची व्यवस्था केली आहे. राज्यघटनेत एका विशेष तरतुदी अंतर्गत बिहार, मध्यप्रदेश व ओरिसातील जनजातिच्या कल्याणासाठी मंत्रालयाची व्यवस्था केली. वर्तमानात अनेक राज्यात या प्रकारचे मंत्रालय आहेत. कलम १९ (५) नुसार अनुसूचित जाती जमातींचा हित रक्षणासाठी स्वातंत्र्याच्या अधिकाराला मर्यादित करण्याची तरतूद आहे. भारतीय राज्यघटना सामाजिक न्यायाच्या सिध्दांतावर आधारित आहे. सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी राज्यघटनेत दलित वर्गांच्या स्थितीत सुधारण्याचे सर्व प्रयत्न केले. या दलित वर्गात अनुसूचित जाती-जमातिशिवाय इतर मागासवर्गीय ही आहेत. त्यांच्या मागासलेपणा दूर करण्यासाठी राज्यघटनेत विशेष व्यवस्था आहे. सामाजिक न्यायात कलम १५ (४) सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाचा विकास आणि कलम १६ (४) सेवात मागासांना पर्याप्त प्रतिनिधित्वासाठी आरक्षणाची व्यवस्था केली. राज्यघटनेत या मागासवर्ग शब्द समुहाचा कलम ३४० मध्येही प्रयोग केला आहे. कलम ३४० (१) मध्ये राष्ट्रपतीला सामाजिक आणि शिक्षणाच्या दृष्ट्या मागास असलेल्या वर्गाची दशा आणि त्यांच्या समस्यांचा शोध घेण्याहेतू आयोगाची नियुक्ती करण्याची शक्ती आहे. या अंतर्गत राष्ट्रपतीद्वारा २९ जानेवारी १९५३ ला कालेलकर आयोग आणि जानेवारी १९७९ ला मंडल आयोग गठन केला.

काका कालेलकर आयोगाने २,३९९ जातिंना मागास जाति म्हणून घोषित केले. आयोगाने मागास वर्गाच्या ओळखीसाठी सामाजिक आणि शैक्षणिक मापदंडांना स्पष्टपणे परिभाषित केले नाही. त्यामुळे वाद-विवादाने जन्म घेतला आणि आरक्षणाच्या शिफारशींना गुंडाळून ठेवले. केंद्र शासनाने पुन्हा जनता पार्टीच्या शासनकाळात १ जानेवारी १९७९ ला बिहारच्या बि.पी.सिंहाच्या अध्यक्षतेत मागासवर्ग आयोग गठीत केला. या कालावधीत १९६३ ला आरक्षणाच्या विरोधात बालाजी विरुध्द म्हैसुर राज्य प्रकरण सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याचा निर्णय दिला. मंडल आयोगाने राष्ट्रपतीमार्फत निर्देशित बिंदु आणि सर्वोच्च न्यायालयामार्फत निर्देशित आरक्षणाची मर्यादा विचारात घेवून ३१ डिसेंबर १९८० ला शासनाकडे आपले निवेदन सादर केले. मंडल आयोगाच्या आकडेवारीनुसार अनुसूचित जाती व जमातीस २२.५६%, मागासांसाठी २७% आरक्षणाची शिफारश केली. मंडल आयोगाचे हे निवेदन १९८० ते १९९० पर्यंत सभागृहात अडखळत राहीले. याकाळात याबाबतची शासनाचे धोरण दुटप्पी राहिले. पंतप्रधान व्हि.पी.सिंहच्या राष्ट्रीय मोर्चा शासनाने आपल्या निवडणूक जाहिरनाम्यानुसार १३ ऑगस्ट १९९० ला सामाजिक-शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गासाठी २७% आरक्षणाची घोषणा केली. या निर्णयाचा फायदा घेणाऱ्या वर्गांनी या निर्णयाचे स्वागत केले. तर आरक्षण विरोधकांनी यास राजकीय कारणांनी प्रेरित निर्णय मानून विरोध म्हणून मारझोड, खुन-खराबा, राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान आणि आत्मदहन केले. परिणामत: भाजपाने आपले समर्थन वापस घेतले आणि व्हि.पी.सिंहाचे शासन कोसळले. मंडल आयोगाशी संबंधित हा निर्णय कायद्याच्या प्रक्रियेत अडकला. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑक्टोबर १९९० ला मंडल अहवालाच्या कार्यान्वयनासाठी स्थगन आदेश पारित केला. मध्यावधी निवडणुकानंतर नरसिंहरावाच्या नेतृत्वातील कॉंग्रेस पक्षाचे सरकार सत्तेत आले. ज्यात २५ सप्टेंबर १९९१ ला सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास व इतर वर्ग, उच्च जातितील गरीब लोकांसाठी १०% आरक्षणाचा प्रस्ताव मांडला. नरसीहराव शासनाच्या या घोषणेस सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. न्यायालयाने नरसिंहराव शासनाच्या १३ ऑगस्ट १९९० च्या अधिसूचनेस वैध ठरवले. परंतु न्यायालयाने त्यासोबत हा ही निर्णय दिला की, मागास जातिच्या संपन्न व्यक्तिंना आरक्षणाचा फायदा मिळणार नाही. मागासवर्गाच्या हितासाठी संसेदत राष्ट्रीय मागास आयोग अधिनियम १९९३ पारित केला. ज्या अंतर्गत १९९३ ला न्यायाधिश आर.एन.प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची स्थापना केली. आयोगाच्या सिफारशीच्या आधारावर मागास वर्गाच्या आरक्षणाची व्यवस्था ८ सप्टेंबर १९९३ पासून लागु करण्यात आली. केंद्र शासनामार्फत ही व्यवस्था लागु केल्यानंतर राज्यस्तरावर ही आरक्षणाची व्यवस्था लागू करण्यात आली. परंतू अनेक राज्यातील आरक्षणाचे प्रमाण वेगवेगळे होते.

भारतीय राज्यघटनेत भाषिक अल्पसंख्याकाच्या संरक्षणाची तरतूद आहे. कलम ३५०, ३५० (क), ३५० (ख) मध्ये भाषिक अल्पसंख्यांक वर्गाची व्यवस्था आहे. १९९० पासून महिलांसाठी भारतीय विधिमंडळात १/३ जागा आरक्षित ठेवण्याचा विषय मांडला जात आहे. १९९६, १९९८ आणि १९९९ मध्ये महिला आरक्षण विधेयक संसदेत मांडण्यात आले. परंतु तिन्हीवेळेस या विधेयकास तीव्र विरोध करण्यात आला. मार्च २००३ मध्ये सर्वपक्षीय बैठकीत समाजवादी पार्टी आणि राष्ट्रीय जनता दलाच्या सदस्यांनी या विधेयकाचा विरोध केला. २२ फेब्रुवारी २०१० ला पुन्हा राष्ट्रपति प्रतिभाताई पाटील यांनी संसदेच्या आर्थिक सत्राच्या प्रारंभास महिला आरक्षण विधेयक लागु करण्याचा मुद्दा मांडला. विधेयकास केंद्रीय केबिनेटची मंजूरीसोबत राज्यसभेचे मान्यता मिळाली. परंतू त्यांच्यापुढे ते सरकले नाही. राज्यघटनेत ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीमार्फत पंचायती संस्थात १/३ महिलांना आरक्षण व अनुसूचित जाती व जमातींना जागा आरक्षित करण्याचे महत्वाचे पाऊल टाकले. लोकशाहीच्या तिसऱ्या भागाच्या रुपात पंचायती राज्यव्यवस्थेत बिहारमधील नीतिश शासनाने महिलांना ५०% आरक्षण दिले. महिलांच्या आरक्षणात कांही अडचण नाही आली. शासनास कोणताही अतिरिक्त ताण उचलावा लागत नाही. त्यासाठी फक्त राजकीय इच्छाशक्ती व



Scanned with CamScanner

भविष्यातील असुरक्षित राजकीय भविष्याच्या भितीस दूर करण्याची गरज आहे.

राज्यघटनेतील वरील सर्व तरतूदींच्या साह्याने भारतातील सर्व सामाजिक समूहांना जोडण्याचे कायदेशीर राजकीय प्रयत्न चालू आहेत. यात काही संदेह नाही की, आरक्षणामार्फत सामाजिक बदल झाला आणि पिढ्यानपिढ्याची सामाजिक व्यवस्था बदलली. यामुळे सामाजिकदृष्ट्या मागास समूहांना आणि समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्याच्या संदभाने सामाजिक वेगळेपणाच्या भितीपासून दूर करुन सामाजिक संधी दिली. त्यांना समाजाशी जोडण्याचे प्रयत्न केले. या बदलामुळे आर्थिक प्रगतीच्या क्षेत्रात फार कमी यश मिळाले. जर आम्ही वरील संदर्भाचा अभ्यास आकडेवारीच्या आधारावर केला तर रोचक तथ्य समोर येते. पारंपारिक मागास मुसलमानांना जे आरक्षणापासून बाहेर आहेत आणि आरक्षण मिळवलेले हिंदू या मागास समुदायात काही अंतर राहिले नाही. आरक्षणाचा फायदा समाजातील मागास वर्गाच्या अंतिम घटकापर्यंत पोहोचला नाही. सदैव याचा फायदा समाजातील उच्चभ्रु आरक्षित लोकांनीच घेतला. सर्वसमावेशक विकासाच्या या प्रतिमानाचा एक धोका असाही आहे की, त्याने जातिय संरचनेस मजबूत केले. कारण पूर्वीचा मागास समूह आज आर्थिकदृष्ट्या सशक्त बनला. तो यापासून वंचित राहू इच्छित नाही. आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतरही अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास प्रवर्गातील लोक आरक्षण सोडायला तयार नाहीत. उलट राजकारणाच्या संधीसाधुपणाने त्यांना घनिष्ट केले. कारण निवडणुकीतील मतदानाचे समीकरण साध्य करण्यासाठी आरक्षण एक हत्यार बनले. भारतीय राज्यघटनेचा अभ्यास करता असे जाणवते की, संविधानाकारांनी त्यांना अपेक्षित असलेला सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकासाची भावना मार्गदर्शक तत्वातून मांडली. तसेच इंदिरा गांधीच्या काळातील बँकाचे राष्ट्रीयीकरण आताचे निश्चलनीकरण सारखे निर्णय महत्वपूर्ण व ऐतिहासिक आहेत. ज्याने सामाजिक विकास व आर्थिक विकासात महत्वाची भूमिका बजावली. भारतात योजनांची निर्मिती व अंमलबजावणीच्या कामात आणि विकासाशी संबंधित सर्व घटकांतील परस्परसंबंध आणि परस्परावलंबी दृष्टीकोनावर नजर टाकता काही प्रमाणात का होईना निष्काळजीपणा व पारदर्शकतेचा अभाव आहे. भारतातील जातीव्यवस्था टप्याटप्याने वर्गीय स्वरुप धारण करत आहे. जातीच्याच आधारावर आरक्षण मिळावे. परंतु वास्तवात भूतकाळात ज्या वर्गाचे उत्पादनाच्या साधनांवर नियंत्रण होते आणि सुविधा होत्या, मग ते ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य म्हणून ओळखले जात असत. युरोपियन व्यवस्थेत मार्क्स त्यांना मालक, जमीनदार व भांडवलदार म्हणतो. ज्यांच्याकडे सुविधा नाहीत ते शुद्र व अस्पृश्य म्हणून भारतात ओळखले जातात. मार्क्स युरोपमध्ये त्यांची ओळख गुलाम, भूमिहीन, श्रमीक, कामगार व नाहीरे अशी करुन देतो. यावरुन विचार करता जाती विभाजन उत्पादन साधनांवरील नियंत्रण आणि त्याच्या अभावातून झाले. यासाठी आर्थिकदृष्ट्या सर्वांना सक्षम करण्याच्या मार्गाचा अवलंब करुन या जाती आणि वर्गाच्या भिंती नष्ट कराव्यात. आरक्षणाची तरतूद जो व्यक्ति आर्थिकदृष्ट्या गरिब, अज्ञानी आणि मागासलेपणाचा शिकार आहे, त्यासाठी असावी न कि जातीसाठी.

आरक्षणामुळे अलिकडील काळात जातिय विद्वेष वाढत आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात मराठा आरक्षण मूक मोर्चाच्या विरोधात बहुजन समाज प्रतिमोर्चे काढत आहे. भारतासारख्या देशातील शासकीय व सार्वजनिक कार्यक्रम आर्थिक हित व मानवी मूल्यांची रुजवण करण्याशी संबंधित आहेत. तर खाजगीकरणातून उदयास येणाऱ्या संस्था नफ्याच्या तत्वावर आधारित आहेत. अशा स्थितीत रोजगाराच्या साधनात कमतरता येते. पारंपारिक सरंजामी मनोवृत्तीमुळे उच्च वर्गात ही भावना बनते की, जातीय, जैविक, लैंगिक, सांप्रदायिक, भाषीक आणि प्रादेशिक विशेषाधिकारच संपूर्ण संकटाच्या मूळाशी आहेत, जे की, अयोग्य आहे. जर काम करण्याच्या अधिकारास प्रत्येक व्यक्तिच्या मुलभूत अधिकाराच्या रुपात घोषित केले आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या तर जातीय द्वेष आणि भेदभावाचे असंतुलन राहणार नाही. जलद आर्थिक विकास, रोजगाराची उपलब्धी, रोजगार गॅरंटी योजना आणि उत्पन्न वाढवणारे धोरणच या समस्यांचे समाधान वाटते. या देशातील सर्वांना आर्थिक संपन्नता मिळावी तर त्यासाठी सामाजिक वातावरणासोबतच शैक्षणिक स्तरात सुधारणा करणे हे एक महत्वपूर्ण साधन आहे. शिक्षणाचा स्तर जितका अधिक वाढले आर्थिक विकासाचा दर तितकाच अधिक वाढेल. मागासवर्गालाही ज्ञान-विज्ञान, बुध्दि-विवेक, कौशल्य आणि तंत्रज्ञानयुक्त रोजगाराच्या संधीत भागीदारी मिळवण्याची पात्रता पूर्ण करण्याकडे लक्ष द्यावे लागेल. स्त्री शिक्षणावर विशेष लक्ष द्यावे लागेल. कारण याचा सरळ प्रभाव सामाजिक विकासावर पडतो. शिक्षण सामाजिक प्रगती व बदलाचे एक महत्वपूर्ण माध्यम आहे. शिक्षणाशिवाय आरक्षणाच्या धोरणाचा लाभ घेता येत नाही.

## ❖निष्कर्ष :

आरक्षण लोकशाही, सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाचे एक साधन आहे. परंतु चिरकालीन किंवा शाश्वत मार्ग नाही. सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाचा एक स्थायीमार्ग म्हणजे सर्व व्यक्तिंना कार्यपूर्तता, काम करण्याची संधी व अधिकार देण्यात आहे. जी संधी व अधिकाराची जाणीव आणि महत्व १२ व्या शतकात महात्मा बसवण्णांनी आणि १९ व्या शतकात कार्लमार्क्सने करुन दिली होती. वर्तमानातील आरक्षण धोरण राजकीय पक्षांना दलित व मागासवर्गांना आपल्याकडे वळवून घेण्याचे एक साधन वाटते. त्यामुळे भारतातील अनेक राज्यात सत्ताधारी असो कि विरोधी पक्ष आरक्षण रुपी रोटी प्रत्येक समाजाच्या ताटात वाढण्याचा प्रयत्न करतात. तसेच ती आरक्षणाची रोटी खावून तो समाज सशक्त होणार नाही, याची ही काळजी राजकीय पक्ष, सत्ताधारी, अभिजन व वर्तमानातील भांडवलदारी वर्ग घेतात. समाजात गरिबी, दुःख, दारिद्र्य, रोजगाराचा अभाव, अज्ञान, व्यसनाधिनता व भ्रष्टाचार हे सर्व राजकीय पक्षाची हत्यारे आहेत. त्यामुळे ही हत्यारे अशी सुरक्षित शाश्वत व सदैव समाजात सुर्य व चंद्र असेपर्यंत असतील याची काळजी सत्ताधारी वर्ग घेतो. कारण सत्तेची अभिलाषा बाळगणाऱ्या वर्ग व लोकांना माहित आहे, एकदा का या देशातील आम आदमीला काम करण्याचा घटनात्मक अधिकार मिळाला, त्याचा आर्थिक स्तर सुधारला की सत्तेची भाकरी मिळवण्याचा जातीय आधार नष्ट होतो. त्यामुळे या देशातील प्रत्येक व्यक्तिने महात्मा गौतम बुध्दापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सर्व महापुरुषांनी सामाजिक व आर्थिक प्रगतीचा जो संदेश आणि विचार आपल्या साहित्यातून मांडला त्याचे अनुकरण करणे क्रमप्राप्त आहे. शिक्षणाची व श्रमाची कास धरुनच विकासाचा आनंद मिळवता येतो आणि न्याय बुध्दी व विवेकाधिष्ठित नागरिक व समाज निर्माण करता येतो.

## ❖संदर्भ ग्रंथ :


१. Social Justice, Shehjad Ahmad, Anmol Publication Pvt.Ltd. New Delhi, २००७.
२.सामाजिक प्रशासन (कल्याण प्रशासन)-डॉ.सुरेंद्र कटारीया, आर.बी.एस.ए.पब्लिशर्स, जयपूर,२०१०.
३.आरक्षण क्यों ? (विधी, सामाजिक परिवर्तन एवं सकारात्मक कार्यक्रम) डॉ.धर्मसिंह सांगर, साहित्यागार, जयपूर, २००७.
४.Caste, Caste-Conflict and reservation-Desai I.B.-Center for social studies, Surat-१९८५.
५.सत्यशोधक जागर-डिसेंबर २०१६, संपादक प्रा.प्रतिमा परदेशी.
६.राजकारणाचा ताळेबंद, भारतीय लोकशाहीची वाटचाल-सुहास पळशीकर, साधना प्रकाशन, पुणे, डिसें-२०१३.


❑❑❑